**नियमित दिवाणी दावा क्र. २२७/२०१७**
**निशाणी ४४ व ४६ वर सामायिक आदेश**

वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरूद्ध वाटपासाठी, ठरावासाठी व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असतांना वादी भानुदास भाउदास बैरागी हे दिनांक ०५.०४.२०२० रोजी नाशिक, ता.जि. नाशिक येथे मयत झाले. परंतु त्यांचे मृत्यु प्रमाणपत्र अर्जदारास दिनांक ०६.०२.२०२१ रोजी प्राप्त झाले. सदरचा अर्ज दाखल करणेस ९ महीने ५ दिवसांचा विलंब झाला आहे. अर्जदार सिन्नर तालुक्याबाहेर राहत असल्याने व दरम्यानचे काळात कोरोनामुळे वादीचे वारस अभिलेखावर घेण्यास उशिर झाला आहे. त्यामुळे विलंब माफ होवून वादीचे वारसांना दाव्यात सामील करणेसाठी सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**२.** वादीचे वारस अ. राजेश भानुदास बैरागी, ब. सुनंदा रोहीदास वैष्णव, क. मिना रविंद्र पांडे, ड. सविता मनोजकुमार बैरागी, इ. दत्ता भानुदास बैरागी व ई. लिलाबाई भानुदास बैरागी हे आहेत. तरी वादीचे सदर वारसांना दाव्यात वादीपणात सामील करणेस परवानगी मिळावी.

**३.** प्रतिवादींना संधी मिळूनही त्यांनी अर्जास जबाब सादर केले नाही. त्यामुळे अर्ज त्यांचे म्हणण्याविना पुढे चालविण्यात आले.

**४.** वादीने सदरचा दावा वाटप, ठराव व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केला आहे. मयत वादीचा मृत्युचा दाखला निशाणी ५१ लगत अभिलेखावर दाखल करण्यात आला आहे. दाव्यातील मयत वादीचे पश्चात त्याचे वारसांना अर्ज चालविण्याचा हक्क आहे. प्रतिवादींना नोटीस लागून देखील ते दाव्यात हजर झालेले नाहीत. अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलट दाव्याचे कामकाज सुलभ चालण्यास मदतच होईल. सदरचे वारस हे दाव्यात वादी क्र. १ चे वारस म्हणून दाव्यात सामील करण्यासाठी अर्जदाराने सदरचे अर्ज केले आहेत. वरील कारणमिमांसेवरून व नैसर्गिक न्यायाच्या द्रृष्टिने मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे :—

**आदेश**

१. निशाणी ४४ व ४६ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. अर्जदाराने मयत वादीचे वारस रेकॉर्डवर घेवून १४ दिवसांत दुरूस्त अर्जाची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

**सही/—**
**(श्रीमती के.एस. खांडरे)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सिन्नर**

**ठिकाण : सिन्नर**
**दिनांक : १९.०९.२०२४**